## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३८५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०७/२०१८

### १) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २२/०७/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष ११ महिने ही घरी एकटीच हजर असता, तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे, अशा फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

### २) संगनमत करून अपहार करून शासकीय रकमेचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद: –

दिनांक ०१/०१/२००६ ते ३१/१२/२००९ पर्यत दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून २१६५ गॅस युनीटची प्रती युनीट दर रूपये २६८०/रु. चा प्रमाणे एकुण ५८,०२,२००/रु चा अपहार करून शासकीय रकमेचे नुकसान केले आहे. सदर फिर्यादीचे विभाने या प्रकरणा बाबत मा.उच्च न्यायालय मुबंई येथे जनहित याचीका क्र. १५३/२०१२ अन्वये दाखल केले असता सदर पिटीशनचे निर्णय वरून सदर विभगाने मा.एम.जी. गायकवाड सेवानिवृत्त मा. उच्च न्यायालय मुंबई याने चौकशी पुर्ण केल्या नंतर सन २०१८ मध्ये अहवालात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा स्पष्ट सुचना दिल्याने फिर्यादी तुशार नवनीत वाघ वय ३६ वर्ष रा. उपप्रादेशीक कार्यालय देवरी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२०,३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

### ३) होन्डा कंपनीचा हार्स पावरचा इंजीनची चोरी–

दिनांक २५/०७/२०१८ चे १७.०० वाजेता दरम्यान यातील फिर्यादीने आपल्या शेताला पाणी देण्याकरीता बावणथडी प्रकल्पाच्या नहरावर मांडलेला होन्डा कंपनीचा ३ हॉर्स पॉवर चा इंजीन २० फुट रबरी पाईप असा एकुण २३,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी मुरलीधर चैनलाल रहांगडाले वय ४९ वर्ष रा. डोंगरी बु. यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे यांचे तोंडी रिपोर्ट वरून स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

### ४) विदयुत अॅल्युमीनीयम तार,लोखंडी अॅगल ची चोरी–

दिनांक २५/०७/२०१८ चे ०१.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. १व २ यांनी संगनमत करून बोलेरो पिकअप क्र. एमएच ४९ डी २४९८ मध्ये विदयुत अॅल्युमिनीयमची तार वजन अंदाजे ३५ किलो, लोखंडी अॅगल २५ किलो असा एकुण २,६००/रु. चा माल चोरून घेवुन जातांना मिळुन आल्याने फिर्यादी कु. भाग्यश्री सेवकराम निखारे वय २४ वर्ष रा. मुरमाडी ह.मु. बेलघाटा वार्ड पवनी वनरक्षक यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. कळपते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

### ५) मोटार पंपची चोरी –

**अ)**दिनांक २४+२५/०७/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादीने त्याचे शेतातील पिकांना पाणी देण्याकरीता शेतातील विहीरीवर लावलेली १.५ एचपीची एसीएम कंपनीची मोटार किंमती ६,५००/रु. ची कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेल्याने फिर्यादी मनोज बाबुरावजी सेलोकर वय ४५ वर्ष रा. नांदोरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. .

**ब)** दिनांक २३+२४/०७/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने रमेश हरीचंद्र बाभरे वय ५२ वर्ष रा. गोपीवाडा यांचे शेतातील विहीरीजवळ ठेवलेली सि.आर.आय. कंपनीची मोटार पंप किमती ५,०००/रु. कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. .

**६) अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या महिलेचा औषधोपचारा दरम्यान मृत्यु झाल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक २५/०७/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. मंगला मिताराम कोरे वय ४८ वर्ष रा. कोंडाळा ह.मु. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर वरून कोंडाळा गावाला सासु व पुत्नीला भेटण्यास मासळ बस स्टॉप वर उतरून मासळ वरून पायदळ रोडने जात असतांना कोणीतरी अज्ञात आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने, नष्काळजीपाणे चालवुन मृतकला धडक देवुन तिच्या डोक्याला मार लागल्याने ती मेडीकल कॉलेज नागपुर येथे औषधोपचारा दरम्या मरण पावल्याने पो.स्टे. मर्ग क्र. २३/२०१८ कलम १७४ जाफौ.चे तपासाच्या चौकशी अहवाला व फिर्यादी दुलीराम रघुनाथ कारे वय ३९ वर्ष रा. कोंडाळा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४, १७७ मोवका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.नी मेश्राम पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**७) तरूनणीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक २४/०७/२०१८ चे २१.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही साईकृपा बाबा हॉटेल आईसक्रीम घेत असता, यातील आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे चेह—यावर चॉकलेटचा कवर फेकुन शरीलाला स्पर्श करण्याचा प्रयत्न करून विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३५४(अ)(१)(४) भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसरहे करीत आहेत.

**८) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून बुक्याने मारून दुखापत केल्याने गुन्हा नोंद: —**

दिनांक २५/०७/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे मित्रासह चौकात शिवमंदीरा जवळ जुन्या गोष्टी सांगत असता यातील आरोपीने ''तुम्ही माझ्या गोष्टी का कराता'' असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करून शिवीगाळ केली व फिर्यादीचे डाव्या डोळयावर बुक्या मारून दुखापत केल्याने फिर्यादी राजेद्र विठोबा पाकमोडे वय ३५ वर्ष रा. तलाव वार्ड प्रभाग क्र. ४ लाखनी यांचे तोंडी व डॉ. परीक्षण अहवाल रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद

**९) उपचारादरम्यान इसमाचा मृत्यु : —**

दिनांक २५/०७/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक सुनिल पारासर डोंगरे वय ४८ वर्ष रा. लालालजपत राय भंडारा याची प्रकृती बिघडल्याने त्यास सा.रू.भंडारा येथे आक्समित विभागात उपचारा करीता आनले असता उपारादरम्यान आकस्मित विभागात मरण पावल्याने डॉ. मेमो व बयाणा वरून सरतर्फे फिर्यादी पो.ना. सार्वे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्हाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५/०७/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक अडयाळ राज्य मार्ग २७१ वरील डांबरी रोडवरील मध्ये भागी लोंकाचे तसेच शाळकरी मुलांच्या जिवातास धोका होईल अशा रितीने वाहन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.नी. ढोबळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. ढोबळे पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २५/०७/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक अडयाळ राज्य मार्ग २७१ वरील डांबरी रोडवरील मध्ये भागी लोंकाचे तसेच शाळकरी मुलांच्या जिवातास धोका होईल अशा रितीने वाहन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.नी. ढोबळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. ढोबळे पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

**१२) अवैध हातभट्टी/देशी दारू / जुगार अड्डयावर धाडी . :–**

दिनांक २५/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी अवैध हातभट्टी,दारु /जुगार अडड्यांवर धाडी घालुन पोलीस स्टेशन करडी, तुमसर, सिहोरा, पवनी, अडयाळ , लाखांदुर, भंडारा व जवाहरनगर येथे अवैध हातभट्टी, देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५० लिटर हा.भ. दारू + ३०० किलो सडवा मोहा पास कि २०,०००/रु व ९०० मिलीलीटर देशी किमती २,६०/रु. तसेच जगारातुन २६,३६६/रु. असा एकुण ४६,६२६/रु चा माल जप्त करण्यात आला.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २५/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०१ तीन सिटर वाहनाकरीता– ०६ ईतर वाहनांवरती – १३६ केसेस करण्यात आले आहे.

**(पोउपनी.जे.के.आडोळे)**
**जनसंपर्क अधिकारी**
**दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.